# ऋणनिर्देश

"सहकारी दुध संस्था आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण" या विषयावर लघुशोधनिबंध लिहित असताना विषयाच्या निवडीपासून अखेरपर्यंत माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. सर्जेराव आ. साळुंखे, प्रपाठक, समाजशास्त्र विभाग , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. यांचे फार मोठे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन करून शोध निबंध पूर्ण करण्यास प्रोत्साहन दिले. त्यांच्या प्रेमळ व क्रियाशील सहकार्यामुळेच मी हा लघुशोधनिबंध पूर्ण करू शकले. तेव्हा त्यांची मी ऋणी आहे. व त्यांच्या ऋणात राहणेच मी पसंत करते. तेव्हा सर्व प्रथम आभार मानने मी माझे आद्य कर्तव्य समजते.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. एस. एन. पवार सर व विभाग प्रमुख डॉ. आर. बी. पाटील सर यांचेही मला वेळोवेळी बहुमोल सहकार्य लाभले. त्यांचीही मी ऋणी व कृतज्ञ आहे. तसेच समाजशास्त्र विभागातील डॉ. जे.बी. अंबेकर, डी श्रीकांत सर, नायक, डॉ. राजलक्ष्मी बर्वे, श्रीमती सुजाता गोखले इत्यादी अधिव्याख्याते, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या सर्वांचे वेळोवेळी मला मार्गदर्शन लाभले या बददल त्यांची मी ऋणी आहे.

माझा लघुशोधनिबंध पूर्ण करण्यासाठी डॉ. व्ही. एस. पाटील, डॉ. पी. ए. कोळी, श्रीमती भारती पाटील यांनी मला माझ्या अभ्यासासाठी लागणारे संदर्भ उपलब्ध करून देऊन सहकार्य केले त्याबददल मी त्यांचीही आभारी आहे. तसेच श्रीमती साळुंखे मॅडम, भोसले मॅडम यांनीही मला वेळोवेळी नैतिक पाठबळ पुरवून मोलाचे सहकार्य केले. त्याबदद्ल मी त्यांचेही आभार मानते.

तसेच बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील श्रीमती सुमित्रा पी जाधव, प्रभारी ग्रंथपाल व ग्रंथालयातील सर्व सेवकांनी माझ्या संशोधनासाठी लागणारी

माहिती व संदर्भ ग्रंथ वेळेत उपलब्ध करून देऊन सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

माझा लघुशोधनिबंध पूर्ण करण्यासाठी श्री भूरके सर सहाय्यक निबंधक (दुग्ध) कोल्हापूर यांनी वेळोवेळी माझ्या अभ्यासासाठी लागणारी माहिती. उपलब्ध करून मला खुप मोठे सहकार्य केले त्याबदद्ल मी त्यांचेही आभार मानते.

माझ्या लघुशोधनिबंधासाठी, चंदगड तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या श्री जयभवानी महिला सहकारी दूध संस्था मर्या. शिनोळी (खुर्द) व श्री बाळकृष्ण महिला सहकारी दुध संस्था मर्या. मजरे कार्वे या दोन संस्थांचे अध्यक्ष, संचालक व सचिव यांचे कडून संस्थेविषयी माहिती, संस्थेचा वार्षिक अहवाल इत्यादी संस्थेविषयीची सखोल माहिती पुरविली, व निवडलेल्या महिला उत्तरदात्याच्या (महिला सदस्या) उत्तम सहकार्यामूळेच हा शोध निबंध पूर्ण होऊ शकला त्याबदद्ल या सर्वांची मी शतशः आभारी आहे.

माझा लघुशोधनिबंध लिहित असताना मला माझ्या सहकारी मैत्रिणी सौ. उज्वला फल्ले, डॉ. सौ जगतकर, कु. प्रज्ञा, गीता, वैशाली, अर्चना, शिला यांचे कडून नैतिक पाठबळ मिळाले त्याबदद्ल मी त्यांची आभारी आहे.

तसेच माझी आई सौ. शोभा, व आण्णा श्री हणमंतराव तसेच माझे सासरे श्री विठ्ठ्ल पाटील, श्री रामचंद्र पाटील व श्री दत्तू पाटील आणि सासूबाई सौ यशोदा, सौ. लक्ष्मी, सौ सखुबाई यांच्या आशीर्वादानेच व अनमोल सहकार्यामूळे माझा हा लघुशोध निबंध पूर्ण होऊ शकला त्याबदद्ल मी त्यांची सदैव ऋणी राहणेच पसंत करेन. तसेच माझ्या पुढील शिक्षणासाठी सतत प्रोत्साहन देणारे माझे पती श्री शिवाजी पाटील, यांचेही बहूमोल्य सहकार्य लाभले त्यामुळे त्यांचे ऋण मी फेडू शकणार नाही त्यामुळे मी सदैव त्यांची आभारी राहणे पसंत करीन.

मी हा शोध निबंध लिहित असताना माझ्यापासून दूर आजोळी, आजी आजोबांकडे राहणारा माझा चिरंजीव 'रोशन' आणि 'सुस्मिता' यांनी खरोखरच

मला खूप मोठी मोलाची मदत केली आहे. माझी दीदी सौ. रश्मी , बंधू धनंजय, व जीजू श्री जी. ओ. पाटील या सर्वांच्या सहकार्यामूळेच मी हा लघुशोधप्रबंध पूर्ण करु शकले या सर्वांच्या उपकाराची परतफेड न करता त्यांच्या ऋणात राहणेच मी माझे कर्तव्य समजते.

श्री सुनिल रा. बिर्जे व सौ सुनिता बिर्जे यांनी सदर प्रबंध संगणकावर बिनचूक व चांगल्या प्रकारे व वेळेत टंकलेखित करुन दिला त्या बदद्लही मी त्यांची आभारी आहे.

एम.फिल्. पदवीच्या सुयशाकडे वाटचाल करीत असताना पावलोपावली ज्यांनी ज्यांनी मला आनंदाने, जिव्हाळयाने, सहृदयतेने मोलाचे मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे मी ऋणी व मनःपूर्वक आभारी आहे.

सौ. रोहिणी शिवाजी पाटील

संशोधिका

कोल्हापूर

दिनांक : ३० जून २००३.